## 35. जम्मू आणि काश्मीर - भाग XXI कलम 370

- भारतीय राज्यघटनेतील कलम 370 नुसार जम्मू काश्मीर राज्याला विशेष दर्जा देऊन 17 नोव्हेंबर 1952 पासून या कलमाची अंमलबजावणी करण्यात आली.
- जम्मू काश्मीर या राज्याचा समावेश परिशिष्ठ एक मध्ये 15 व्या क्रमांकाचे राज्य म्हणून करण्यात आले.
- जम्मू काश्मीर हे भारतातील एकमेव स्वंतत्र राज्यघटना असेलेले राज्य असून त्या घटनेत भाग 13 परिशिष्ठ 7 व 158 कलमे आहेत.
- जम्मू काश्मीर राज्यातील नागरिकांना दुहेरी नागरिकत्व होते.
  1. भारताचे नागरिकत्व
  2. जम्मू काश्मीरचे नागरिकत्व
- 26 ऑक्टोबर 1947 रोजी जम्मू काश्मीरचा राजा महाराजा हरिसिंग व पंतप्रधान पंडित नेहरू यांच्यात करार होवून जम्मू काश्मीर भारतात विलिन करण्यात आले. व त्यानूसार भारत सरकारला जम्मू काश्मीरच्या बाबतीत तीनच अधिकार देण्यात आले.
  1. संरक्षण
  2. परकिय कामकाज
  3. दळण-वळण

**जम्मू काश्मीरची संविधान सभा व घटना**

- जम्मू काश्मीरची घटना तयार करण्यासाठी ऑगस्ट - सप्टेंबर 1951 मध्ये प्रौढ मतदान पद्धतीद्वारे निवडणूका घेण्यात आल्या ज्यात 75 जागा नॅशनल कॉन्फरन्स ने जिंकल्या होत्या.
- 31 ऑक्टोबर 1951 रोजी जम्मू काश्मीरच्या संविधान सभेची पहिली बैठक झाली.
- 17 नोव्हेंबर 1956 रोजी जम्मू काश्मीरची घटना स्वीकृत करण्यात आली.
- 26 जानेवारी 1957 पासून जम्मू काश्मीरच्या घटनेची अंमलबजावणी झाली.
- **राजधानी -** श्रीनगर (हिवाळी), जम्मू (उन्हाळी)
- **जम्मू काश्मीरचे कायदेमंडळ**

**1. विधान सभा -**

**एकूण सदस्य -** 111 पैकी 24 जागा POK साठी रिक्त - 87 सध्या 84 जागा

- जम्मू काश्मीरच्या विधानसभेत महिलांना अपुरे प्रतिनिधत्व मिळाल्यास राज्यपाल दोन महिला प्रतिनिधीचे नामनिर्देशन करू शकतात.
- **कार्यकाळ -** 6 वर्षाचा (सध्या 5 वर्ष)

**2. विधानपरिषद -**

- एकूण सदस्य संख्या-36 पैकी 28 निर्वाचित, 8 नामनिर्देशित-36.
- 1/3 सदस्य दर दोन वर्षांनी निवृत्त होतात व तेवढेच निवडूण येतात. (२०१९ मध्ये विधानपरिषद रद्द करण्यात आली.)

**कार्यकारी मंडळ -**

- इ. स. 1965 जम्मू काश्मीर घटनादुरूस्ती सदर-ए-रियासत हे राज्य विधानसभेने निर्वाचित करावयाचे पद रद्द करण्यात आले. त्याजागी राष्ट्रपतीने नेमलेल्या राज्यपाल पदाची निर्मिती करण्यात आली.

# भारतीय राज्यव्यवस्था नोट्स

- इ. स. 1965 मध्ये वजीर-ए-आझम हे पद रद्द करून त्या जागी मुख्यमंत्री पदाची निर्मिती करण्यात आली.

**उच्च न्यायालय -**

- जम्मू काश्मीरला स्वतंत्र उच्च न्यायालय असेल त्यात एक मुख्य न्यायाधीश व राष्ट्रपती ठरवतील इतके न्यायाधीश असतील.
- **राज्यभाषा -** जम्मू काश्मीर ची राज्यभाषा उर्दू असेल तर सरकारी कामकाजाची भाषा इंग्रजी असेल.
- **लोकसेवा आयोग -** जम्मू काश्मीरसाठी स्वतंत्र लोकसेवा आयोग असेल आणि आयोगाचे अध्यक्ष व सदस्यांची नेमणूक राज्यपाल करतील.

**जम्मू काश्मीरची सध्याची घटनात्मक स्थिती**

- सध्या जम्मू काश्मीर मधून लोकसभेत सहा सदस्य निवडून दिले जातात.
- जम्मु काश्मीर राज्याची क्षेत्र सीमा यात बदल करण्यासाठी राज्यविधीमंडळाच्या संमतीची आवश्यकता होती. सध्या संसद स्वतःच्या मर्जीने बदल करू शकते.
- भारतीय घटनेतील भाग 5 पूर्वी जम्मू काश्मीरला लागू नव्हात सध्या लागू झाला आहे.
- संसदेला पूर्वी जम्मू काश्मीर बद्दल शेषाधिकार नव्हता आता आहे.
- मूलभूत हक्क काही अपवाद व अटीसह जम्मू काश्मीरला लागू होते सध्या रद्द झाले.
- मार्गदर्शक तत्वे व मूलभूत कर्तव्ये पूर्वी लागू नव्हते. सध्या लागू झाले आहेत.
- अंतर्गत अशांतेच्या कारणावरून कलम 352 नुसार लागू करावयाची राष्ट्रीय आणिबाणीसाठी राज्यविधीमंडळाची मान्यता घेणे पूर्वी बंधनकारक होते. सध्या नाही
- जम्मू काश्मीरसाठी 356 नुसार दोन आणिबाणी आहेत.

1. **राज्यपाल राज्यवट -** राज्याचे प्रशासन जम्मु काश्मीरच्या घटनेच्या तरतूदीप्रमाणे चालविणे अशक्य झाल्याची राज्यपालांची खात्री झाल्यास राष्ट्रपतीच्या सहमतीने ती लावता येते. (सध्या रद्द)
2. **राष्ट्रपती राजवट -** राज्याचे प्रशासन भारताच्या घटनेच्या तरतूदीप्रमाणे चालविणे अशकय झाल्याची राज्यपालांची खात्री झाल्यास राष्ट्रपती, राष्ट्रपती राजवट लावू शकतात.

- कलम 360 आणि कलम 365 पूर्वी जम्मू काश्मीरला लागू नव्हते सध्या लागू झाले आहेत.
- जम्मू काश्मीरला पूर्वी भारतीय राज्यघटनेतील परिशिष्ठ 5 व 6 लागू नव्हते. सध्या लागू झाले आहेत.

जम्मू काश्मीरचे कलम 370 रद्द करण्याचा निर्णय लोकसभेत 5 ऑगस्ट 2019 तर राज्यसभेत 6 ऑगस्ट 2019 रोजी मंजूर करण्यात आला तर राष्ट्रपतींनी विधेयकास 7 ऑगस्ट, 2019 रोजी मान्यता दिली.

- 31 ऑक्टोबर 2019 रोजी जम्मू काश्मीर व लडाख हे दोन केंद्रशासित प्रदेश निर्माण करण्यात आले आहेत.